सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग,**
**सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा**

जिल्हा परिषद, विस्तारीत इमारत, कक्ष क्र.२२ व २४, पहिला मजला, सातारा-४१५ ००१
दुरध्वनी क्र. ०२१६२ / २३९२४१ इमेलः- adtpsatara@gmail.com

जा.क्र.ए.वि.नि.व.प्रो.नि./क.२०(३)/ससंसा/ ११८५ दि. ९/०५/२०२५

प्रति,

मा.उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय,
मध्यवर्ती इमारत, तळमजला, पुणे.

**विषय :-** **महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६** मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीत (UDCPR मधील) विनियम क्र.५.१.१ (१) चे तरतुदींना अनुसरुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २० (३) अन्वये सूचना प्रसिध्द करणेबाबत.

**संदर्भ :-** शासनाचे आदेश क्र. टिपीएस-१८२०/६१४/प्र.क्र.७९/२०२१/नवि-१३, दि.२७/०३/२०२५

महोदय,

विषयांकित आदेशाच्या अनुषंगाने प्राधिकृत अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा, सातारा यांनी निर्गमित केलेल्या सूचनेची प्रत (इंग्रजी व मराठी) यासोबत पाठवित आहे. प्रस्तुतची सूचना कृपया जास्तीच्या खपाचे स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात यावी व प्रस्तुत सूचना कोणत्या वृत्तपत्रात कोणत्या दिनांकास प्रसिध्द करण्यात आली आहे. त्याबाबतची माहिती या कार्यालयास कृपया द्यावी. प्रसिध्दीबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे. (ज्या जिल्ह्यांमध्ये इंग्रजी वृत्तपत्र उपलब्ध नसल्यास सर्वाधिक खपाच्या मराठी वृत्तपत्रात इंग्रजी व मराठी भाषेत प्रसिध्द करण्यात यावी.)

| | | |
|---|---|---|
| १. | जाहिरात देणाऱ्या कार्यालयाचे नाव | सहायक संचालक, नगर रचना, सातारा |
| २. | जाहिरात कोणत्या दिनांकापर्यंत द्यावयाची आहे | तात्काळ |
| ३. | प्रसिध्दीचे स्वरुप | सर्वाधिक खपाच्या |
| ४. | कोणत्या जिल्ह्यात | सातारा |
| ५. | किती वृत्तपत्रात | एक मराठी व एक इंग्रजी वृत्तपत्रात |
| ६. | कितीवेळा | एकदा |

श्री. कंठाळे

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
उपसंचालक, नगर रचना (ना.मं.)
आ.क्र. १०७८ दिनांक- १६.०५.२०२५
संबधित अधि./कर्म.
website publication

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
मु.का., पुणे-१. आवक क्र. ६८३०
टिपीव्ही -१/२/३/४/५/६/७
16 MAY 2025

| | | |
|---|---|---|
| ७. | जाहिरात खर्चाचे देयक कोणत्या अधिकाऱ्याकडे पाठवायचे त्यांच्या कार्यालयाचे नाव पत्ता | सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा<br>जिल्हा परिषद, विस्तारीत इमारत, कक्ष क्र.२२ व २४, पहिला मजला, सातारा-४१५ ००१ |

त्यानुसार उपरोक्त सूचना आपले स्तरावरुन स्थानिक पातळीवर प्रसिध्द करणेची कार्यवाही करावी, ही विनंती. सर्वाधिक खपाचे वृत्तपत्रात प्रसिध्द होईल, यांची कृपया दक्षता घ्यावी.

आपला,

सोबत : संदर्भिय सुचनेच्या २ प्रती

(दत्तात्रय काळे)
सहायक संचालक,नगर रचना,
सातारा.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

- एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनिमय क्र. ५.१.१ (i) चे तरतुदींना अनुसरुन उक्त अधिनियमातील कलम २० (३) चे तरतूदीनुसार सूचना

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**

**सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा यांचे कार्यालय, सातारा**
जिल्हा परिषद, विस्तारीत इमारत, कक्ष क्र.२२ व २४, पहिला मजला, सातारा-४१५ ००१

क्रमांक :- प्रा.यो.सातारा/कलम २०(३)/रस्त्यांचे जाळे नकाशे/ससंसा/ ११८८
दिनांकः ९/५ /२०२५

सोबतची सूचना (मराठी /इंग्रजी) महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

TOWN PLANNING & VALUATION DEPTT. ASSISTANT DIRECTOR OF TOWN PLANNING सत्यमेव जयते SATARA BRANCH

**(दत्तात्रय काळे)**
प्राधिकृत अधिकारी तथा,
सहायक संचालक, नगर रचना,
सातारा शाखा, सातारा.

प्रति,

१) मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.

(२/- विनंती करण्यात येते की, सदरची सुचना नगर रचना संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी कृपया संबंधितांना निर्देश द्यावेत.)

२) मा.सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांना माहितीस्तव सादर.

३) मा. व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे.

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत सुचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात पुणे विभागीय पुरवणी भाग-१ मध्ये प्रसिध्द करण्यात येऊन त्यांच्या प्रत्येकी ५ प्रती मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे; मा.सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे व या कार्यालयास पाठवाव्यात.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

- एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनिमय क्र. ५.१.१ (i) चे तरतुदींना अनुसरुन उक्त अधिनियमातील कलम २० (३) चे तरतूदीनुसार सूचना

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**

**सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा यांचे कार्यालय, सातारा**
जिल्हा परिषद, विस्तारीत इमारत, कक्ष क्र.२२ व २४, पहिला मजला, सातारा-४१५ ००१

क्रमांक :- प्रा.यो.सातारा/कलम २०(३)/रस्त्यांचे जाळे नकाशे/ससंसा/ ११८४
दिनांकः ९/५ /२०२५

सोबतची सूचना (मराठी /इंग्रजी) महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

TOWN PLANNING & VALUATION DEPTT.
ASSISTANT DIRECTOR OF TOWN PLANNING
सत्यमेव जयते
SATARA BRANCH

**(दत्तात्रय काळे)**
प्राधिकृत अधिकारी तथा,
सहायक संचालक, नगर रचना,
सातारा शाखा, सातारा.

प्रति,

१) मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.

(२/- विनंती करण्यात येते की, सदरची सुचना नगर रचना संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी कृपया संबंधितांना निर्देश द्यावेत.)

२) मा.सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांना माहितीस्तव सादर.

३) मा. व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे.

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत सुचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात पुणे विभागीय पुरवणी भाग-१ मध्ये प्रसिध्द करण्यात येऊन त्यांच्या प्रत्येकी ५ प्रती मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे; मा.सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे व या कार्यालयास पाठवाव्यात.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व
नगर रचना अधिनियम, १९६६

• एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनिमय क्र. ५.१.१ (1) चे तरतुदींना अनुसरून उक्त अधिनियमातील कलम २० (३) चे तरतूदींनुसार सूचना

**महाराष्ट्र शासन**
**सहायक संचालक, नगर रचना,**
**सातारा शाखा कार्यालय, सातारा.**

क्रमांकः- प्रा.यो.सातारा/कलम २०(३)/रस्त्यांचे जाळे नकाशे/ससंसा/११८३,दि. ९/ ५ /२०२५

**सूचना**

ज्याअर्थी, राज्य शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "**उक्त अधिनियम** " असे संबोधिले आहे) नुसार, महाराष्ट्र राज्यातील विविध सातारासाठी प्रादेशिक योजना मंजूर केल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१ कक) (ग) व २० (४) मधील तरतुदींनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-१८१८/प्र.क्र.-२३६/१८/डिपी व आरपी कलम ३७(१कक) (ग) व कलम २० (४) नवि-१३, दि. ०२.१२.२०२० अन्वये एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली महाराष्ट्र राज्याकरिता (काही अपवाद वगळता) मंजूर केली असून, दि. ०३.१२.२०२० पासून अंमलात आलेली आहे व ती प्रादेशिक योजना क्षेत्रांकरिता लागू आहे (यापुढे "**उक्त नियमावली**" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, सदर नियमावलीमधील विनियम क्र. ५.१.१ चे तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या हद्दीपासून २ कि.मी., नगरपरिषदेच्या हद्दीपासून १ कि.मी. आणि नगर पंचायतीच्या हद्दीपासून ०.५० कि.मी. अंतरातील प्रादेशिक योजनेचे क्षेत्रामध्ये, जिथे प्रादेशिक योजनेत झोन नकाशे तयार केलेले आहेत किंवा तयार केलेले नाहीत, अशा क्षेत्रांसाठी योग्य रस्त्यांच्या जाळ्यांचे नकाशे तयार करणेचे आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीतील विनियम क्र. ५.१.१ चे तरतुदीनुसार प्रादेशिक योजना क्षेत्रातील प्रारुप रस्त्यांच्या जाळ्यांच्या नकाशांबाबत उक्त अधिनियमाच्या कलम २० (३) चे तरतुदीनुसारची कार्यवाही पूर्ण करणेकरिता शासनाच्या नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. टिपीएस-१८२०/६१४/प्र.क्र. ७९/२०२१/नवि-१३, दि.२७.०३.२०२५ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम १५४ चे तरतुदीनुसार दिलेल्या शासन निदेशान्वये संबंधीत जिल्ह्याचे सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा कार्यालय सातारा यांना अधिकार प्रत्यायोजित करण्यात आले आहे;

आणि त्याअर्थी, आता, सदर सूचनेशी संलग्न 'परिशिष्ट अ' नुसारच्या उक्त परिघस्त क्षेत्रात प्रारुप रस्त्यांच्या जाळ्यांच्या नकाशांचे प्रसिध्दीकरण करणे व त्यानुषंगाने ३० दिवसांचे विहित मुदतीत नागरीकांच्या प्राप्त सूचना व हरकती यावर सुनावणी घेणे आवश्यक असल्याने, उक्त अधिनियमाच्या कलम २० (३) च्या तरतुदीन्वये सदरहू सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहेत;

उक्त प्रारुप रस्त्यांच्या जाळ्यांच्या नकाशांच्या अनुषंगाने नागरीकांच्या काही सूचना / हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा सातारा कार्यालयाकडे लेखी स्वरुपात पाठवाव्यात, सदरची सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा, सातारा या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या सूचना / हरकती विचारात घेतल्या जातील;

उक्त प्रारुप रस्त्यांच्यां जाळ्यांचे नकाशे नागरिकांच्या अवलोकनार्थ सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा, सातारा या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. उक्त प्रारुप रस्त्यांच्या जाळ्यांचे नकाशे व तपशील योग्य शुल्क आकारून सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा सातारा या कार्यालयात नागरीकांना उपलब्ध होऊ शकतील.

TOWN PLANNING & VALUATION DEPT. ASSISTANT DIRECTOR OF TOWN PLANNING सत्यमेव जयते SATARA BRANCH

**(दत्तात्रय काळे)**
प्राधिकृत अधिकारी तथा,
सहायक संचालक, नगर रचना,
सातारा शाखा, सातारा.

## परिशिष्ठ- अ

क्रमांकः प्रा.यो.सातारा/कलम २०(३)/रस्त्यांचे जाळे नकाशे/ससंसा/ ११८३          दि. २/५/२०२५

| अ.क्र. | परिघस्त नकाशाचे नाव | |
|---|---|---|
| १. | सातारा नगरपरिषद | (१.०० कि.मी.) |
| २. | कराड नगरपरिषद | (१.०० कि.मी.) |
| ३. | मलकापूर नगरपरिषद | (१.०० कि.मी.) |
| ४. | रहिमतपूर नगरपरिषद | (१.०० कि.मी.) |
| ५. | फलटण नगर परिषद | (१.०० कि.मी.) |
| ६. | म्हसवड नगरपरिषद | (१.०० कि.मी.) |
| ७. | वाई नगरपरिषद | (१.०० कि.मी.) |
| ८. | कोरेगांव नगरपंचायत | (०.५ कि.मी.) |
| ९. | वडूज नगरपंचायत | (०.५ कि.मी.) |
| १०. | लोणंद नगरपंचायत | (०.५ कि.मी.) |
| ११. | खंडाळा नगरपंचायत | (०.५ कि.मी.) |
| १२. | दहिवडी नगरपंचायत | (०.५ कि.मी.) |
| १३. | मेढा नगर पंचायत | (०.५ कि.मी.) |
| १४. | पाटण नगर पंचायत | (०.५ कि.मी.) |

**(दत्तात्रय काळे)**
प्राधिकृत अधिकारी तथा,
सहायक संचालक, नगर रचना,
सातारा शाखा, सातारा.

Maharashtra Region and Town
Planning Act, 1966

----------------------------------------------

- Notice under the provisions of section 20(3) of the said Act in pursuance with the provisions of the Regulation No. 5.1.1 (1) of the Unified Development Control & Promotion Regulations

**Government of Maharashtra**
**Town Planning Department**
**Assistant Director of Town Planning.**
**Satara Branch, Satara.**

No.RP Satara/Sec 20(3)/Road Network Plans/ADTP/ 1183 Dt.9/5/2025.

## NOTICE

Whereas, the State Government has been sanctioned the Regional Plans for Satara in Maharashtra State as per the provisions of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as **'the said Act'**).

And whereas, the Unified Development Control and Promotion Regulations for Maharashtra State (with some exceptions) has been sanctioned under the provisions of section 37(1AA) (c) & 20(4) of the said Act, by the Government in Urban Development Department vide Notification No. TPS-1818/CR-236/18/DP & RP/Sec.37 (1AA) (c) & 20(4)/UD-13, dated 02.12.2020 and come into force with effect from 03.12.2020 and it is applicable for the area under Regional Plans (hereinafter referred to as **'the said Regulations**);

And whereas, as per the provisions of Regulation No. 5.1.1 of the said Regulations, the areas in Regional Plan within a belt of 2 k.m. from the boundaries of Municipal Corporation, 1 km. from the boundaries of Municipal Council and 0.50 k.m. from the boundaries of Nagar Panchayat, where zone plans are prepared or not prepared, appropriate Road Network Plans to be prepared for such areas;

And whereas, as per the provisions of Regulation No.5.1.1 of the said Regulations, the Government in Urban Development Department vide Government Order No. TPS-1820/614/C.R. 79/2021/UD-13, dated 27.03.2025, has been delegated the powers as per the provisions of section 154 of the said Act to the respective Assistant Director of Town Planning, Branch Office, of the Concerned District, in order to carry out the process under the provisions of section 20(3) of the said Act regarding the draft Road Network Plans for the area within the Regional Plan area;

And therefore, now, it is necessary to publish the draft Road Network Plans in the said area as per "Schedule-A' attached to the said notice to hear the suggestions and objections from the public within the prescribed period of 30 days, therefore, the said notice is being published in the Maharashtra Government Gazette under the provisions of section 20(3) of the said Act.

If any person have any suggestions/objections in accordance with the Draft Rond Network Plans, they should send these suggestions/objections in writing to the office of the Assistant Director of Town Planning, Satara Branch, Satara within the period of 30 days from the date of publication of this Notice in Maharashtra Government Gazette. The suggestions/objections received by the office of Assistant Director of Town Planning, Satara Branch, Satara within 30 days from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette will be considered;

The draft Road Network Plans are available for the public inspection during office hours at the office of the Assistant Director of Town Planning, Satara Branch, Satara The copies of the said draft Road Network plans and its particulars shall be available to the public at reasonable price in the office of the Assistant Director of Town Planning, Satara Branch, Satara.

TOWN-PLANNING & VALUATION DEPTT. ASSISTANT DIRECTOR OF TOWN PLANNING सत्यमेव जयते SATARA BRANCH

**(Dattatray Kale)**
Assistant Director of Town Planning.
Satara Branch, Satara.

**Schudule –A**

**Accompanimenat to Notice**

No.RP Satara/Sec 20(3)/Road Network Plans/ADTP/ 1183 Dt. 9 / 5 /2025.

| Sr.no. | Name of Fringe Area | |
|---|---|---|
| 1. | Satara Municipal Council | (1.00 km) |
| 2. | Karad Municipal Council | (1.00 km) |
| 3. | Malakapur Municipal Council | (1.00 km) |
| 4. | Rahimatpur Municipal Council | (1.00 km) |
| 5. | Phaltan Municipal Council | (1.00 km) |
| 6. | Mhasvad Municipal Council | (1.00 km) |
| 7. | Wai Municipal Council | (1.00 km) |
| 8. | Koregaon Nagar Panchayat | (0.5 km) |
| 9. | Vaduj Nagar Panchayat | (0.5 km) |
| 10. | Lonand Nagar Panchayat | (0.5 km) |
| 11. | Khandala Nagar Panchayat | (0.5 km) |
| 12. | Dahivadi Nagar Panchayat | (0.5 km) |
| 13. | Medha Nagar Panchayat | (0.5 km) |
| 14. | Patan Nagar Panchayat | (0.5 km) |

TOWN PLANNING & VALUATION DEPTT.
ASSISTANT DIRECTOR OF TOWN PLANNING
सत्यमेव जयते
SATARA BRANCH

**(Dattatray Kale)**
Assistant Director of Town Planning.
Satara Branch, Satara.